Date:- 12-12-18
Day:- बुधवार
③

# 1. युनो

24 ऑक्टोबर 1945 रोजी संयुक्त राष्ट्र संघटनेची स्थापन झाली आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता टिकवणे आंतरराष्ट्री य सहकार्यातून आर्थिक आणि सामाजिक विकास साधने व मानवी हक्कांचे संरक्षण करणे, अशा अनेक उद्दिष्टांच्या पुर्ततेसाठी ही संघटना उदयास आली यापुर्वी 1920 साली राष्ट्रसंघाची स्थापना झाली होती. राष्ट्रसंघ जगातील पहिली आंतरराष्ट्रीय संघटना आहे.

जगातील राष्ट्रांच्या वर्तणुकीचे नियंत्रण समन्वयन आणि व्यवहारात सुसंवाद साधणारी संघटना म्हणजे युनो होय युनो आंतरराष्ट्रीय कायदा आणि मानवी मुल्यांवर आधारीत संघटना आहे. युनो आंतरराष्ट्रीय मध्यवर्ती स्वरुपाची सर्वोच्च राजवट आहे. जगातील मानवी संस्कृतीची आशा म्हणजे युनो आहे. या युनोचा उगम बहुपक्षीय विचारविनि मय प्रक्रियेतून झाला आहे.

1) युनोच्या स्थापनेची पार्श्वभूमी :-

आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता पहिल्या महायुद्धाने नष्ट केली. जगाला लोकशाहीच्या दिशेने आणि शांततेच्या दिशेने घेऊन जाण्यासाठी 1920 साली राष्ट्रसंघाची स्थापना झाली हिटलर व मुसोलिनीचा हृदय दुसरे महायुद्ध यामुळे राष्ट्रसंघ अपयशी ठरले. पुन्हा जगाला शांतता आणि सुरक्षितता निर्माण करण्याच्या दिशेने व जगाला तिसऱ्या महायुद्धाच्या धोक्यापासून वाचवि- ण्यासाठी एका सक्षम आंतरराष्ट्रीय संघटनेचा स्थापनेचा विचार करण्यात आला या विचाराला खालील टप्प्यातून मुर्तरुप देण्यात आले.

1) 1 जानेवारी 1942 ला तत्कालीन अमेरिकन राष्ट्राध्यक्ष रुझवेल्ट यांनी संयुक्त राष्ट्रे या संघटनेची घोषणा केली.

2) 1941 ला अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष रुझवेल्ट आणि ब्रिटनचे पंतप्रधान चर्चिल यांच्यामध्ये उत्तर अटलांटिक समुद्रात बैठक झाली या बैठकीत आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितते उपाययोजना संदर्भात आणि कलमी सनद बनवण्यात आ या सनदेला उत्तर अटलांटिक सनद म्हणतात ही सनद संयुक्त राष्ट्र संघटनेच्या निर्मितीतील पहिले पाऊल

3) 1943 ला अमेरिका, ब्रिटन व फ्रांसच्या नेत्यांमध्ये कासाब्लांका येथे परिषद झाली

4) या परिषदेला आंतरराष्ट्रीय संघटनेच्या निर्मितीसाठी फ्रांसचे समर्थन मिळाले.

5) 1943 सालीच मास्को येथे सोव्हिएत रशिया, ब्रिटन, अमेरिका आणि चिन यांच्या प्रतिनिधींची एक बैठक होऊन सामुहिक सुरक्षिततेच्या तत्वावर आंतरराष्ट्रीय संघटनेची स्थापना व्हावी यावर सहमती झाली.

6) 21 ऑगस्ट ते 7 ऑक्टोबर 1944 ला वॉशिंग्टन येथे चर्चा झाली या चर्चेत ब्रिटन, सोव्हीएत रशिया, अमे आणि चिन यांनी सहभाग घेतला. या चर्चेत संघटनेचे स्वरूप व तरतुदी विषयी चर्चा झाली. चर्चेअंती एक प्रस्ताव तयार करण्यात आला हा प्रस्ताव डंबस्टोन ओक्स प्रस्ताव म्हणून ओळखला जातो.

7) 6 फेब्रुवारी 1945 ला याल्टा येथे अमेरिका, ब्रिटन आणि सोव्हीएत रशियाच्या प्रतिनिधीमध्ये बैठक झाली य बैठकीत सुरक्षा परिषदेचे स्वरूप मतदान, ठराव, प्रस्त आणि एकाधिकार याबाबत चर्चा झाली.

8) सॅन फ्रान्सीको येथे 25 एप्रिल ते 26 जून 1945 ला परिषद भरली या परिषदेला 50 राष्ट्रांचे 282 प्रतिनि उपस्थित होते. या परिषदेमध्ये युनोच्या संविधानाला समित आणि आयोग व नकाराधिकार (सुरक्षा समिती - चीन- फ्रांस अमेरिका- सोव्हीएत रशिया आणि इंग्लंड) मान्यता

देण्यात आली.
१) २८ आक्टोबर 1945 ला युनोच्या सनदेवर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या.
युनोच्या राज्यघटनेत संविधानाची उद्देश पत्रिका 19 प्रकरणे आणि 111 कलम आहेत.
अशा प्रकारे संयुक्त राष्ट्र संघटनेची स्थापना करण्यात आली २४ आक्टोबर हा दिवस UN दिवस म्हणून साजरा केला जातो.

2) युनोची रचना :-
संयुक्त राष्ट्र संघटनेच्चे रचनेमध्ये खालील घटकांचा समावेश केला जातो.
1) आमसभा
2) सुरक्षा समिती
3) आर्थिक आणि सामाजिक समिती
4) विश्वस्त समिती
5) आंतरराष्ट्रीय न्यायालय
6) सचिवालय व महासचिव
संयुक्त राष्ट्र संघटनेचे मुख्यालय न्युयॉर्क येथे आहे. युनोच्या स्थापनेवेळी संयुक्त राष्ट्र संघटनेची सदस्य संख्या 51 होती ज्यामध्ये उत्तर आणि दक्षिण अमेरिकेतील राष्ट्रांची संख्या सर्वात जास्त होती त्या खालोखाल युरोपियन राष्ट्रांची संख्या होती तर आशिया आणि आफ्रिका खंडातील सदस्य संख्या कमी होती. 1971 साली चिनला युनोच्या सुरक्षा समितीचे कायम सदस्यत्व प्राप्त झाले.
संयुक्त राष्ट्र संघटनेचा प्रत्येक सदस्य आमसभेचा सदस्य असतो.


संयुक्त राष्ट्र संघटनेत वरील 6 घटकांशिवाय 15 मुख्यसंस्था अनेक समित्या, उपसमित्या व आयोगांचा समावेश आहे.

संयुक्त राष्ट्रांची धारना मान्य असणाऱ्या कोणत्याही शांतताप्रिय राष्ट्राला संयुक्त राष्ट्र संघटनेचे सदस्य बनता येते. सदस्यत्वासाठी आमसभेची मान्यता व सुरक्षा समितीची शिफारस आवश्यक आहे.

वरील प्रमाणे युनोच्या रचनेत अनेक घटकांचा समावेश होतो. सध्या युनोची सभासद संख्या 193 आहे.

## * संयुक्त राष्ट्रसंघटनेची उद्दिष्टे:

24 आक्टोबर 1945 ला युनोची स्थापना झाली काही प्रमुख उद्दिष्टांना प्रमाण मानत त्यांची पुर्तता करण्यासाठी दुसऱ्या महायुद्धाच्या पार्श्वभुमीवर या संघटनेची स्थापना झाली. या संघटनेच्या उद्दिष्टेन खालील प्रमाणे स्पष्ट करता येते.



वरील आकृतीच्या साहाय्याने युनोची उद्दिष्टे स्पष्ट केली आहे. स्थापने पासून ते आतापर्यंत युनो या उद्दिष्टांच्या पुर्ततेसाठी प्रयत्न करत आहे त्या प्रयत्नामध्ये युनोला सर्व राष्ट्र सहकार्य करतात. या सहकार्य व युनोच्या प्रयत्नामुळेच तिसरे महायुद्द घडले नाही.

1) मानवी हक्काचे संरक्षण व प्रसार करणे.
2) आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता.
3) आंतरराष्ट्रीय कायद्याचे संरक्षण.
4) राष्ट्राराष्ट्रांत सहकार्य आणि मित्रत्व स्थापन करणे.
5) प्रत्येक संघर्ष लोकशाही मार्गाने सोडविणे.
6) सर्वांगिण विकास करणे.
7) सदस्य राष्ट्रांच्या स्वातंत्र्य व सार्वभौमत्वाचे रक्षण करणे.
8) आर्थिक विकास साधने.

* आमसभा:—

संयुक्त राष्ट्र संघटनेच्या रचनेतील आमसभा सर्वात महत्त्वाचे अंग आहे. या आमसभेचा उल्लेख टाऊन मिटिंग ऑफ द होल वर्ल्ड Town Meeting of the whole world असा केला जातो. विमर्श मंडळ अशी ओळख संयुक्त राष्ट्र संघटनेचे विचार आमसभेची आहे. या आमसभेची रचना पुढील प्रमाणे आहे.

संयुक्त राष्ट्र संघटनेच्या घटनेतील 4 प्रकरणात आमसभेचे स्वरूप आणि रचना याची नोंद केली आहे.

1) सदस्य संख्या:—

आमसभेचे सदस्य युनोचे सर्व राष्ट्र असतात युनोच्या प्रत्येक सदस्य राष्ट्राला आमसभेत पाच

प्रतिनिधी पाठविण्याचा अधिकार आहे.

2) मतदान:-

प्रत्येक राष्ट्रांच्या पाच प्रतिनिधींचे एकमत गृहीत धरले जाते.

3) कार्यालय:-

युनोचे कार्यालय/ मुख्यालय न्युयॉर्क येथे आहे.

4) बैठका:- आमसभेची वर्षातून एकदा सप्टेंबर महिन्यात नियमितपणे बैठक होते. याशिवाय विशेष बैठक बोलवण्याचा अधिकार युनोच्या महासचिवांना आहे. सुरक्षा परिषदेच्या शिफारशीनुसार विशेष बैठक बोलवली जाते.

5) बैठकीचा अध्यक्ष:

वार्षिक बैठकी दरम्यान अध्यक्षाची निवड केली जाते. ही निवड गुप्त मतदान पद्धतीने केली जाते. या अध्यक्षाचा कार्यकाळ एका वर्षाचा असतो. आमसभेचे कामकाज चालविणे शिस्त राखने इत्यादी अधिकार अध्यक्षाला आहेत. या अध्यक्षाच्या मदतीला 21 उपाध्यक्ष असतात. याशिवाय आमसभेची आणीबाणी बैठक होते. आतापर्यंत आणीबाणीची बैठक 9 वेळा घेण्यात आली आहे.

6) आमसभेच्या समित्या:

संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आमसभेचे कामकाज खालील 6 प्रमुख समित्यामार्फत चालवले जाते.

i) राजकीय आणि सुरक्षा संबंधी प्रश्नाविषयीची समिती

ii) आर्थिक आणि वित्तीय प्रश्नासंबंधीची समिती

iii) सामाजिक मानवतावादी आणि सांस्कृतिक प्रश्नासंबंधीची समिती

iv) विश्वस्त राष्ट्रासंबंधीची समिती.

v) प्रशासकीय आणि अर्थसंकल्पा विषयीची समिती.

11) ~~कायदेशिर~~ कायदेशीर प्रश्नासंबंधीची समिती.

* आमसभेचे वैशिष्ट्ये:-

1) आमसभा जागतिक स्थरावरील मध्यवर्ती व्यासपिठ आहे.
2) आमसभेचे ठराव शिफारशींच्या स्वरुपातील असतात.
3) आमसभा युनोचे अर्थसंकल्प तयार करण्याचे महत्त्वपुर्ण कार्य करते.
4) आमसभेने तिसऱ्या जगातील अनेक राष्ट्रांना स्वयंनिर्णयाचा अधिकार मिळवून दिला आहे.
5) आमसभेच्या ठरावावरच अनेक आंतरराष्ट्रीय करार आधारलेले आहेत.
6) आमसभेत सर्व निर्णय बहुमताने घेतले जातात.
7) जे ठराव आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षिततेशी संबंधीत असतात. त्याच्या मान्यतेसाठी 2/3 बहुमताची गरज असते.

* आमसभेचे अधिकार व कार्य:-

आमसभा जगाचे व्यासपिठ आहे. जगातील सर्वात मोठे कायदेमंडळ म्हणून आमसभेची ओळख आहे. संयुक्त राष्ट्रातील एक महत्त्वपुर्ण अंग म्हणून आमसभेला खालील अधिकार व कार्य पार पाडावी लागतात.

1) विचार विनिमय आणि शिफारस करणे:-

आमसभा ही युनोची चर्चा वाटाघाटी आणि शिफारस करणारी महत्त्वपुर्ण शाखा आहे. आमसभेत आंतरराष्ट्रीय शांतता सुरक्षितता, सर्वच राष्ट्रांच्या आर्थिक, सामाजिक विकासाशी निगडीत प्रश्न व समस्यांवर चर्चा होते. उदा:- पर्यावरण, मानवी हक्क, दहशतवाद, निशस्त्रीकरण, अण्वस्त्रांचा प्रसार, वंशवाद, मानवतावादी हस्तक्षेप, निर्वसाहतीकरण इत्यादी या सर्व विषयांवर चर्चा

करुन प्रश्न सोडविण्यासाठी राष्ट्राराष्ट्रात सहकार्य वाढविणे व शिफारस करण्याचे काम आमसभा करते.

2) आर्थिक अधिकार :-

युनोच्या अर्थसंकल्प नियंत्रीत करण्याचे काम आमसभा करते. हे काम युनो प्रशासकीय आणि अर्थसंकल्प विषयीची समितीमार्फत करते. उदा:- अर्थसंकल्पाला मंजुरी देणे, निधीचे वाटप करणे, दरवर्षी कोणत्या क्षेत्रावर किती खर्च करावा. कोणत्या राष्ट्राकडून किती निधी घ्यावा. विकास कार्यातर होणारा खर्च व शांतता मोहिमेवर होणारा खर्च या सर्व खर्चावर आमसभेचे नियंत्रण असते

3) निवडणूकी विषयीचे अधिकार :-

युनोच्या अनेक महत्त्वपुर्ण शाखा आणि संस्थेत प्रतिनिधी निवडण्याचा अधिकार आमसभेला आहे. या अधिकाराचा वापर करुन आमसभा खालील प्रतिनिधीची निवड करते.

i) सुरक्षा समितीतील 10 हंगामी किंवा अस्थायी सदस्यांची निवड.

ii) आर्थिक आणि सामाजिक समितीतील सदस्यांची निवड.

iii) आंतरराष्ट्रीय न्यायालयातील न्यायाधिशांची निवड.

iv) सुरक्षा समितीच्या शिफारशीनुसार महासचिवाची निवड.

4) घटना दुरुस्तीचा अधिकार :-

युनोच्या घटनेत दुरुस्ती करण्याचा अधिकार आमसभेला आहे. या घटना दुरुस्तीसाठीच्या अटी आहेत

i) आमसभेचे 2/3 बहुमत

ii) सुरक्षा समितीच्या पाच

- कायम सदस्य (अमेरिका, इंग्लंड, रशिया, फ्रान्स, चिनि) राष्ट्रांची मान्यता

या दोन अटींची पुर्तता झाल्यानंतर एकूण सदस्य संख्येच्या 2/3 बहुमताने घटना दुरुस्ती विधेयक मंजूर होते.

5) परिवेक्षणाचे कार्य :-

युनोच्या अधिपत्याखाली कार्यरत असणाऱ्या सर्व संस्था, संघटना यांचा अहवाल स्विकारणे प्रशासकीय कामासाठी नोकर भरती करणे नोकर भरतीचे नियम ठरवणे व सर्व संस्था आणि संघटनामध्ये समन्वय घडवण्याचे कार्य आमसभा करते

वरील कार्यामुळेच आमसभेने 10 डिसेंबर 1948 ला मानवी हक्कांचा वैश्विक जाहिरनामा घोषित केला 1997 चा बाह्य अंतराळा संबंधीचा करार. 1968 चा अण्वस्त्र प्रसार बंदी करार (NPT) व 1971 चा समुद्रतळ शस्त्र अस्त्र नियंत्रण करार केला आहे.

6) सुरक्षा समिती :-

सुरक्षा समिती युनोचे कार्यकारी मंडळ आहे. सुरक्षा समिती संयुक्त राष्ट्र संघटनेचे आमसभेने घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करणारे सभागृह आहे. सुरक्षा समितीची रचना खालील प्रमाणे आहे.

1) सदस्य संख्या :-

सुरक्षा समितीमध्ये दोन प्रकारचे सदस्य असतात.

- कायमस्वरूपी - अमेरिका, रशिया, ब्रिटन, फ्रान्स आणि चीन हे पाच कायमस्वरूपी सभासद राष्ट्र आहे.
- हंगामी - सुरक्षा समितीचे 10 हंगामी सदस्य असतात

या हंगामी सदस्यत्वाची विभागणी खंडनिहाय खालील प्रमाणे केली जाते.

| अनु क्र. | खंड | सभासद संख्या |
|---|---|---|
| 1 | आशिया / आफ्रिका | 5 |
| 2 | पुर्व युरोप | 1 |
| 3. | लॅटीन अमेरिका | 2 |
| 4 | पश्चिम युरोप आणि इतर | + 2 |
| | एकूण | 10 |

वरील प्रमाणे युनोमध्ये हंगामी सदस्य घेतले जातात.

2) नकाराधिकार :-

सुरक्षा समिती 5 कायमस्वरुपी सदस्य असलेल्या राष्ट्रांना नकार अधिकाराचा वापर करता येतो. हंगामी सदस्यांना हा अधिकार नाही. आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षेच्या विषयावर पाचही राष्ट्रांचे एकमत होणे आवश्यक आहे. नकार अधिकाराचा वापर आतापर्यंत अमेरिका रशिया चीन इंग्लंड व फ्रान्स या राष्ट्रांनी केला तर सर्वात जास्त वापर अमेरिका व रशियाने केला आहे.

3) सदस्यांची निवड :-

युनोमध्ये हंगामी सदस्यांची निवड आमसभेकडून केली जाते ही निवड 2 वर्षासाठी असते.

4) मतदान पद्धती :-

सुरक्षा समितीमध्ये मतदानाच्या दोन पद्धती असतात.

i) दैनंदिन कामकाजासंबंधीच्या निर्णयासाठी 15 पैकी 9

राष्ट्रांचे सकारात्मक मत आवश्यक असते.
ii) आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षिततेशी निगडीत कोणत्याही निर्णयासंबंधी 5 कायमस्वरूपी राष्ट्रांचे एकमत आवश्यक असते.

5) सुरक्षा परिषदेची यंत्रणा:-
आपली उद्दिष्टे साध्य करण्यासाठी सुरक्षा समितीची काही विशिष्ट यंत्रणा असते. या यंत्रणेमध्ये मिल्ट्री स्टाफ समिती, पारंपारिक शस्त्र अस्त्र समिती. अनेक कार्यकारी आणि विशेष समिती विविध आयोग सुरक्षा समितीला मदत करत असतात.

6) सुरक्षा समितीचे संघर्ष व्यवस्थापनाची कार्य पद्धती:-
राष्ट्राराष्ट्रातील संघर्ष सोडवूण आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षा टिकविण्याचे काम सुरक्षा समिती दोन प्रकारे करते.
i) राष्ट्राराष्ट्रातील प्रश्न चर्चा आणि सहकार्याच्या माध्यमातून सोडविले जावेत म्हणून वाटाघाटी घडवून आणणे, चौकशीचे आदेश देणे, चौकशी घडवून आणणे, मध्यस्थी करणे, समोपचाराने प्रश्न सोडविणे, लवाद नेमणे, विभागीय संघटनांची मदत घेणे.
ii) दंडात्मक कार्यवाही करणे ज्यामध्ये आर्थिक बहिष्कारापासून लष्करी हस्तक्षेपापर्यंतच्या मार्गाचा समावेश होतो.

7) सुरक्षा समितीचे अधिकार आणि कार्य:-
i) आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता टिकवणे.
ii) आक्रमक राष्ट्राविरुद्ध आवश्यक ती कार्यवाही करणे.
iii) नविन सदस्यांना संयुक्त राष्ट्रात प्रवेश देणे.
iv) आंतरराष्ट्रीय न्यायालयातील न्यायाधिशांची निवड

करणे.

v) युनोच्या महासचिवाच्या निवडीसाठी अनुमोदन देणे

vi) आंतरराष्ट्रीय न्यायालयाला आंतरराष्ट्रीय कायद्यातील तरतुदी विषयी सल्ला मागणे

vii) आर्थिक आणि सामाजिक परिषदेकडून मदत घेणे.

viii) आमसभेला काही वार्षिक अहवाल सादर करणे.

ix) राष्ट्राराष्ट्रातील संघर्ष त्वरीत थांबवण्याचे आदेश देणे.

x) राष्ट्राराष्ट्रातील संघर्षात आंतरराष्ट्रीय कायद्याचे उल्लंघन झाले किंवा नाही हे तपासण्यासाठी चौकशी आयोग नेमणे.

xi) आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी न्यायालयाकडे एखादा संघर्ष चौकशीसाठी सोपविणे.

xii) वंशसंहार मानवतावादाविरोधी गुन्हे आणि युद्ध गुन्ह्यांच्या संदर्भात हंगामी लवाद नेमण्याचा अधिकार सुरक्षा समितीला आहे.

वरील प्रमाणे सुरक्षा समितीची रचना असून अधिकार आहेत. या अधिकारामुळेच सुरक्षा समितीचे युनोमध्ये महत्त्वाचे स्थान आहे. या अधिकारामुळेच युनोला निर्णयाची अंमलबजावणी करता येते.

## * आर्थिक आणि सामाजिक परिषद :-

संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सभासद राष्ट्राच्या आर्थिक आणि सामाजिक विकासासाठी सक्रिय असणारा घटक म्हणजे आर्थिक आणि सामाजिक परिषद होय. आर्थिक आणि सामाजिक विकास साधणे हा युनोचा एक उद्देश्य आहे. या उद्देश्य पुर्तेसाठी च ही परिषद स्थापन करण्यात आली.

युनोच्या संविधानातील कलम 55 मध्ये आर्थिक आणि सामाजिक परिषदेची उद्दिष्ट्ये स्पष्ट

करण्यात आली आहेत.

1) सदस्य राष्ट्रांचा आर्थिक आणि सामाजिक विकास, रोजगार व राहणीमानाचा दर्जा उंचावणे.

2) आंतरराष्ट्रीय स्थरावरील आर्थिक, सामाजिक व आरोग्य विषयक समस्या सोडविणे.

3) शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात प्रगती करण्यासाठी राष्ट्रांमध्ये सहकार्य निर्माण करणे.

4) सदस्य राष्ट्रात मानवी हक्कांच्या संरक्षणाची जाणीव निर्माण करणे.

सदस्य संख्या आर्थिक आणि सामाजिक परिषदेत 54 सदस्य आहेत सर्वांना प्रतिनिधीत्व मिळावे. या हेतूने सदस्य संख्येत वेळोवेळी वाढ केली जाते. कालावधी या परिषदेतील सदस्यांची निवड 3 वर्षासाठी होते.

ही निवड करण्याचे अधिकार आमसभेला आहेत.

1) समित्या आणि आयोग:-

ही समिती आपले कार्य विविध आयोग, स्थायी समित्या व हंगामी समित्यामार्फत पार पाडते. उदा:- कार्यकारी आयोग, वित्त आणि रोजगार आयोग, लोकसंख्या आयोग, महिला आयोग, आर्थिक आयोग इत्यादी

2) बैठका:-

या समितीच्या वर्षातून दोन वेळा बैठका होतात. या बैठकाचे नियंत्रण व निरीक्षण अध्यक्षाकडून होते. प्रत्येक वर्षी अध्यक्षाची निवड होते. समितीतील निर्णय साध्या बहुमताने घेतला जातो प्रत्येक सदस्याला एकच मत देण्याचा अधिकार आहे.

3) या समितीचे कार्य:-

या समितीचे महत्त्व व कार्यक्षेत्राचा

विस्तार झाला आहे. यामुळे ही समिती आर्थिक आणि सामाजिक प्रश्नावर युनोमध्ये कार्य करणारी महत्वाची समिती आहे. या समितीला पुढील कार्य करावी लागतात.

1) आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, आरोग्य इत्या क्षेत्रामध्ये विकास पूरक अध्ययन, संशोधन करून त्याच योजनाच्या अहवाल आमसभेला सादर करणे.

2) विकासाच्या प्रश्नाबाबत युनोमधील आमसभेसह अनेक संस्था आणि संघटना शिफारस करणे.

3) आर्थिक आणि सामाजिक विकासासाठी विविध आयोगाची स्थापना करणे.

4) चर्चा व विचारांचे आदान प्रदान व्हावे म्हणून आंतरराष्ट्रीय परिषदांचे आयोजन करणे.

5) सुरक्षा परिषदेला आवश्यक ते माहिती पुरविणे.

6) या समिती अंतर्गत कार्य करणारा विविध संस्थामध्ये समन्वय साधने.

7) मानवी हक्काच्या संरक्षणाची जाणीव वाढवणे.

8) आमसभेला वार्षिक अहवाल सादर करणे,

9) कामगाराचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करणे.

10) गरीब आणि अविकसीत राष्ट्रासाठी उपासमार वाढती गुन्हेगारी महिला आणि बालकाचे प्रश्न उपोषण, वेसनाधिनता, शहरीकरण, वाढती लोकसंख्या इत्यादी प्रश्नावर लक्ष देणे.

11) कलम 66 नुसार आमसभेने टाकलेल्या जबाबदारीचीही पुर्तता या समितीला करावी लागते.

वरील प्रमाणे सर्व कार्य आर्थिक, सामाजिक परिषद करते. यामुळे यास सक्रिय समिती म्हणून संबोधले जाते.

4) आंतरराष्ट्रीय न्यायालय :-

राष्ट्राराष्ट्रातील संघर्ष प्रश्न व समस्या या बाबत दाद मिळावी यासाठी आंतरराष्ट्रीय न्यायालयाची स्थापना केली आहे. आंतरराष्ट्रीय न्यायालयाच्या स्थापनेच्या विषय 1944 साली झालेल्या डंबरटोन ओक्स प्रस्तावातून पुढे आली तर 1945 च्या याल्टा परिषदेत आंतरराष्ट्रीय न्यायालयाची घटना तयार करण्यात आली. या घटनेवर 1945 मध्ये झालेल्या सॅन फ्रान्सीस्को 1945 मध्ये परिषदेत चर्चा झाली या सर्व प्रक्रियेतून आंतरराष्ट्रीय न्यायालय निर्माण झाला. स्थापना वर्ष 18 एप्रिल 1946 ला आंतरराष्ट्रीय न्यायालयाची स्थापना झाली युनोच्या घटनेतील कलम 92 नुसार आंतरराष्ट्रीय न्यायालय युनोची महत्त्वाची शाखा आहे. न्यायालयाने घटनेच्या चौकटीत राहून कार्य करावे.

5) सदस्य संख्या :-

संयुक्त राष्ट्राचे सर्व सदस्य आंतरराष्ट्रीय न्यायालयाचे सदस्य असतात. आमसभा आणि सुरक्षा समितीने ठरविलेल्या अटीनुसार आंतरराष्ट्रीय न्यायालयाचे सदस्य बनता येते. या सर्व सदस्यांनी न्यायालयाच्या घटनेत बांधील राहावे व न्यायालयाच्या निवाडांच्या सन्मान करून ते मान्य करावे लागते. आंतरराष्ट्रीय न्यायालयात खालील बाबीचा समावेश होतो.

1) आंतरराष्ट्रीय न्यायालय फक्त राष्ट्रांमधील संघर्ष सोडविते.
2) कोणत्याही व्यक्ती या न्यायालयाच्या सदस्य बनू शकत नाही.
3) कोणत्याही व्यक्तीवर या न्यायालयात खटला चालत नाही.
4) न्यायालयाने दिलेला न्याय फक्त संबंधीत राष्ट्रांवरच बंधनकारक असतो.
5) आंतरराष्ट्रीय न्यायालयाने दिलेला निर्णय अंतिम स्वरुपा असतो. त्या विरुद्ध दुसरीकडे दाद मागता येत नाही.
6) सुरक्षा परिषद किंवा आमसभेने आंतरराष्ट्रीय कायद्यातील

तरतुदी विषय सल्ला मागी मागितल्यास तो देण्याचा अधिकार न्यायालयाला आहे.
7) या न्यायालयाच्या घटनेतील कलम 36 नुसार आंतर-राष्ट्रीय कायद्याशी संबंधीत प्रश्नाविषयी किंवा आंतर-राष्ट्रीय करारातील तरतुदीचा अर्थ लावण्याचा अंतिम अधिकार या न्यायालयाला आहे.
8) या न्यायालयाने दिलेला निर्णय संबंधीत राष्ट्रांवर बंधनकारक असतो.
9) न्यायालयाने दिलेल्या निर्णयाचे पालन एखादे राष्ट्र करत नसेल तर त्यावर कोणती कारवाई करावी हे सुरक्षा समिती ठरविते.

आंतरराष्ट्रीय न्यायालयात एकूण न्यायाधिशांची संख्या 16 आहे. या न्यायाधिशांची निवड आमसभा आणि सुरक्षा समितीव्दारे निवडणूक पध्दतीने केली जाते. या न्यायाधिशांची निवड 9 वर्षासाठी होते.

* सचिवालय / महासचिव :-

संयुक्त राष्ट्र संघटनेच्या दैनंदिन व प्रशासकीय कारभार चालवण्यासाठी महासचिवाची निवड केली जाते.

- नेमणूक :- महासचिवाची निवड ~~आमसभेव्दारे गुप्त मतदान~~ सुरक्षा समितीच्या शिफारशीवरुन आमसभा करते.
- निवड पध्दती :- महासचिवाची निवड आमसभेव्दारे गुप्त मतदान पध्दतीने होते. उपस्थित सदस्यांपैकी बहुमताची आवश्यकता असते.
- कार्यकाळ :- महासचिवाची निवड 5 वर्षासाठी केली जाते. एकाच व्यक्तीची दुसऱ्यांदा महासचिव पदी निवड होऊ शकते.
- महासचिवाचे कार्य :-

1) युनोच्या सर्व कार्यावर देखरेख ठेवणे.

2) युनोच्या कार्यात समन्वय राखणे.

3) सचिवालयातील उपमहासचिव, प्रशासकीय अधिकारी, सहाय्यक, विशेषज्ञ या सर्व कर्मचारी वर्गाची ~~आंतरराष्ट्री~~ आमसभेने ठरवून दिलेल्या नियमानुसार निवड करणे.

4) संकट प्रसंगी व आणीबाणीच्या काळात राजनयाच्या माध्यमातून प्रश्न सोडविण्यासाठी मदत करणे.

5) कलम 99 नुसार आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षिततेला धोका पोहचवणारा व महत्वाच्या प्रश्न सुरक्षा समितीसमोर आणणे.

6) युनोची निपक्षपाती संघटना म्हणून प्रतिमा टिकून ठेवण्याचे काम महासचिवाला करावे लागते.

7) कलम 98 नुसार आमसभेला वार्षिक अहवाल सादर करणे.

8) बदलत्या आव्हानांचा सामना करण्यासाठी युनोला सक्षम बनवणे.

9) युनोच्या भविष्यातील वाटचालीची दिशा ठरवणे.

असे वरील कार्य युनोला करावे लागते. सध्या पोर्तुगालचे माजी पंतप्रधान ॲन्टोनो गुट्रीस हे युनोचे महासचिव आहेत.

युनोच्या महासचिवाचे पद आंतरराष्ट्रीय राजकारणातील सर्वात महत्वाचे पद आहे. या पदावर विराजमान होणाऱ्या व्यक्तीला आंतरराष्ट्रीय राजकारणाची चांगली समज असने गरजेचे आहे. ट्रिग्वेली हे युनोचे पहिले महासचिव होते.

★ विश्वस्त परिषद :-

संयुक्त राष्ट्र संघटनेच्या महत्वाच्या 6 अंगापैकी विश्वस्त समिती हे महत्वाचे अंग आहे. या अंगाची रचना खालील प्रमाणे आहे.

1) तरतूद :—

युनोच्या राज्यघटनेतील कलम 7 मध्ये विश्वस्त समितीची तरतूद केली आहे.

2) विश्वस्त प्रदेश म्हणजे असे प्रदेश की जेथे दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीपर्यंत स्वयंशासन प्रस्थापित झालेले नव्हते. विश्वस्त म्हणून सोपविण्यात आलेले बहुतेक प्रदेश अविकसीत संरक्षणदृष्ट्या महत्वाचे आणि संवेदनशील होते या प्रदेशांवर पर्यवेक्षणाचे कार्य सुरक्षा परिषदेतील विश्वस्त समिती करत होती.

3) या विश्वस्त समितीवर चिन, फ्रान्स, रशिया, इंग्लंड आणि अमेरिका या पाच कायम राष्ट्रांना सदस्यत्व देण्या आले आहे.

याशिवाय आमसभेकडून निवडून आलेल्या काही प्रतिनिधीचा समावेश विश्वस्त समितीवर केला जा

* विश्वस्त प्रदेश :—

| | विश्वस्त प्रदेश | विश्वस्त म्हणून काम पाहणारे राष्ट्र | स्वातंत्र्य प्राप्तीचे वर्ष |
|---|---|---|---|
| 1) | टोबो लॅंड | ग्रेट ब्रिटन | 1957 |
| 2) | टोबो | फ्रान्स | 1960 |
| 3) | सोमाली लॅंड | इटली | 1960 |
| 4) | कॅमरून्स | फ्रान्स | 1960 |
| 5) | कॅमरून्स | ग्रेट ब्रिटन | 1961 |
| 6) | टॅंगानिका | ग्रेट ब्रिटन | 1961 |
| 7) | पश्चिम सामुआ | न्युझिलॅंड | 1962 |
| 8) | रुआंडा बुरुंदी | बेल्जियम | 1962 |
| 9) | नौरु | ऑस्ट्रेलिया | 1968 |
| 10) | न्युगिनिआ | ऑस्ट्रेलिया | 1975 |
| 11) | पॅलाऊबेटे | अमेरिका | 1994 |

*　*　*